पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - २३४**

**(सभावृत्तांत)**

दिनांक - २६/०७/२०१६ वेळ - दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक २६/०७/२०१६ रोजी दुपारी २.३० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम - सभापती
२) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
३) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
४) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५) मा.काळे विमल रमेश
६) मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
८) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
९) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०) मा.अॅड.संदीप गुलाब चिंचवडे
११) मा.नेटके सुमन राजेंद्र
१२) मा.वाबळे संजय मल्हारराव
१३) मा.जवळकर वैशाली राहुल

याशिवाय मा.तानाजी शिंदे-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्य लेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.दुधेकर, मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.पठाण-उप शहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडुसकर, मा.माछरे, मा.दुरगुडे, मा.आष्टीकर, मा.लोणकर- सहाय्यक आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.कारेकर-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.कपिले, मा.थोरात, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.औंभासे, मा.गट्टुवार, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.मोरे-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.माने-विभागीय अधिकारी-पीएमपीएमएल, मा.बोदडे- प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक-मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक- मा.जालिंदर बाप्पू शिंदे

मा.स्थायी समितीची दिनांक २६/०७/२०१६ ची साप्ताहीक सभा मंगळवार दिनांक ०२/०८/२०१६ रोजी दुपारी २.१५ पर्यंत तहकुब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

सभापती - मंगळवार दिनांक २/८/२०१६ रोजी दुपारी २.१५ पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

**(आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २३४**

**(सभावृत्तांत)**

**(दिनांक २६/०७/२०१६ ची तहकुब सभा)**

दिनांक - ०२/०८/२०१६ वेळ – दुपारी २.१५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दि. २६/७/२०१६ ची तहकुब मा.स्थायी समिती सभा मंगळवार, दिनांक ०२/०८/२०१६ रोजी दुपारी २.१५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम - सभापती
२) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
३) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
४) मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
५) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
६) मा.काळे विमल रमेश
७) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
८) मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
९) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
१०) मा.अ‍ॅड.संदीप गुलाब चिंचवडे
११) मा.नेटके सुमन राजेंद्र
१२) मा.वाबळे संजय मल्हारराव
१३) मा.जवळकर वैशाली राहुल

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्य लेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्य लेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.दुधेकर, मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.पठाण-उप शहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.माछरे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा लोणकर - सहाय्यक आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे,मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा. कपिले, मा.थोरात,

मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.जुंधारे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टुवार, मा.शेख, मा.पुजारी, मा.गायकवाड, मा.भोसले, मा.मोरे-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.माने-विभागीय अधिकारी पीएमपीएमएल, मा.बोदडे- प्रशासन अधिकारी, मा.मुंढे-सहा.प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक १९/०७/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २३३) चा सभावृतांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक –१६८०३ विषय क्रमांक – १

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- सुरक्षा

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/०३/कावि/६०१/२०१६ दि.०१/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागामार्फत मनपाच्या विविध मिळकती/उदा. करसंकलन विभागीय कार्यालय, पाणी पुरवठा, कार्यशाळा इ. ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेचे काम ठेकेदारी पध्दतीने ई-निविदा सुचना क्र.२/२०१४-२०१५ अन्वये ४३१ रखवालदार मदतणीस कर्मचारी पुरवून कामकाज चालू आहे. परंतू JnNURM - BSUP शहर झोपडपट्टी पुर्नवसन अंतर्गत से.क्रं.२२ निगडी येथे ४३ इमारती बांधण्यात आलेल्या असून संरक्षण खात्याच्या रेड झोन हद्दीमध्ये येत असल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई सुरु असलेले बांधकाम तसेच ठेवणेबाबत व पुर्ण झालेल्या इमारतींचे वाटप न करणेबाबत स्थगिती आदेश दिलेले आहेत, परंतू सदर ठिकाणी भविष्यामध्ये अनैतिक बाबी घडुन अपघात होवू नये व इमारती सुरक्षित राहणेकामी स्थापत्य BSUP प्रकल्प विभागाकडील पत्र क्रं स्थआ/BSUP प्र/१७९/२०१६ दि.२४/५/२०१६ चे पत्रान्वये विभागास कळविले आहे, त्यानुसार सदर ठिकाणची सुरक्षा व्यवस्था करणे करीता १) मे.युनिक डेल्टा सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.यांना ०५, २) मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हिसेस यांना ०७, व ३) मे.शुभम उद्योग यांना ०६ प्रमाणे एकूण जादा १८ रखवालदार मदतनीस कर्मचारी पुरविणे कामी मान्यता देवून ई-निविदा सुचना क्र.२/२०१४-२०१५ च्या अटी व शर्ती नुसार व मान्य केलेल्या दरानुसार व वेळोवेळी जानेवारी, जुलै मध्ये लागू होणा-या महागाई भत्ता (विशेष भत्ता) नुसार रखवालदार मदतनीस कर्मचारी यांची मा.स्थायी समीतीने मान्यता दिलेनंतर विभागाच्या सोयीच्या तारखेपासून ते दिनांक ३१/१२/२०१६ अखेर तैनात करणेकामी त्या वेतनपोटी होणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८०४ विषय क्रमांक –२

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पअक/१/कावि/३५३/२०१६ दि.५/७/२०१६

विषय:-मोशी कचरा डेपोसाठी नेरी, नागपुर या संस्थेने बफर झोन संबंधी दिलेल्या अहवालामध्ये उपाययोजना राबविणेबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८०५ विषय क्रमांक –३

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- स्थापत्य

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/४३९/१६ दि.११/७/२०१६

विषय:-प्रभाग क्र. ४३ मधील स्मशान भुमीचे विस्तारीकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८०६ विषय क्रमांक – ४

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- सुरक्षा

सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/०३/कावि/६१६/२०१६ दि.०७/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणाहून शहरांचे विविध ठिकाणी मोठया प्रमाणात वाहनांची रोज ये - जा अहोरात्र चालू असते त्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील विविध (सिग्नल असलेले व सिग्नल नसलेले) जास्त वर्दळीचे चौक येथील रहदारी सुरळीतपणे चालू रहाणेसाठी वाहतूक पोलीसांचे मदतीकरीता ठेकेदारी पध्दतीने १ (एक) वर्ष कालावधीसाठी १०० ट्रॅफिक वार्डन मदतनीस कर्मचा-यांची नेमणूक केलेली आहे परंतू सहा.पोलिस आयुक्त वाह. ३ पुणे शहर यांचे कडील जावक क्र.४४१/२०१६ दि २२/०४/२०१६ अन्वये मनपा हद्दीतील पुर्वीच्या ज्या चौकामध्ये व रस्त्यावर रहदारी कमी होती ते चौक व रस्ते रहदारी वाढल्याने वाहतूक कोंडी समस्या सोडवून वाहतूक नियमन करण्यासाठी सध्या असलेल्या ट्रॅफिक वार्डन अपुरे पडत असल्याने ५० ट्रॅफिक वार्डन कर्मचारी १) मे.एल.एम.सी.सि.फोर्स.प्रा.लि. यांना ३७ ट्रॅफिक वार्डन व २) मे.श्रीकृपा सर्व्हीसेस प्रा.लि., यांना १३ ट्रॅफिक वार्डन कर्मचारी नियुक्त करणे कामी मा.स्थायी समितीने मान्यता दिलेनंतर सुरक्षा विभाग कामकाजाच्या सोयीनुसार ते दिनांक ३१/१२/२०१६ अखेर निविदेतील अटी-शर्ती नुसार ५० ट्रॅफिक वार्डन कर्मचारी तैनात करणेकामी त्या वेतनपोटी होणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८०७ विषय क्रमांक – ५
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- क क्षेत्रीय कार्यालय
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कक्षे/आ१५/कावि/५७६/२०१६ दि.१४/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिचंवड महानगरपालिका क क्षेत्रीय कार्यालयातर्गत सांगवी दापोडी व नवी सांगवी येथील पवना नदीपात्रातील जलपर्णी/हायसिंथ काढणेकामी मा.आयुक्त यांचे कडील आदेश क्र.कक्षेका/आ१५/कावि/४३५/१६ दि.०६/०६/२०१६ अन्वये र.रू.१,००,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख फक्त) आगावू घेतलेली होती. सदरचे कामकाज मा.आयुक्त साहेब यांनी दिलेल्या सुचनेनुसार थेट पध्दतीने विभागामार्फत रोजाने कर्मचारी लावून व जे.सी.बी.च्या सहाय्याने करणेत आलेले आहे. दि.११/०६/२०१६ ते २२/०६/२०१६ अखेर एकूण १२६.५ मनुष्यबळाचा वापर करून र.रू. ५०६००/- इतका खर्च करणेत आला असून दि.११/०६/२०१६ ते २२/०६/२०१६ अखेर एकूण ७६ तास जे.सी.बी.वापर करून र.रू.४९४००/- इतका खर्च करणेत आलेला आहे. सदरचा एकूण खर्च र.रू.१,००,०००/- इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. तरी पवना नदीपात्रातील हायसिंथ काढणेकामी प्रत्यक्ष झालेला एकूण र.रू.१,००,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८०८ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- क्रीडा
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/४/कावि/९६/२०१६ दि.०८/०७/२०१६
विषय:-सन २०१६-२०१७ मध्ये महिला मुलींना योग प्रशिक्षण देणे, ही योजना राबविणे बाबत.

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८०९ विषय क्रमांक – ७
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/२०/कावि/४१८/२०१६ दि.१४/०७/२०१६
विषय:-मनपाचे क्रीडा विभागासाठी विविध प्रकारचे व्यायामशाळा साहित्य खरेदीबाबत..

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८१० विषय क्रमांक – ८
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- ड क्षेत्रिय कार्यालय
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/३८३/२०१६ दि.२/०७/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४-१२/२०१५-१६ अन्वये पिंपळे निलख परिसरात टँकरव्दारे पाणीपुरवठा करणेकामी मे.सुदर्शन वॉटर सप्लायर्स नि.र.रु ३,४९,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख एकोणपन्नास हजार फक्त) पेक्षा -०३.००% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३,३८,५३०/- पर्यंत काम करुन घेणेस, तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८११ विषय क्रमांक – ९
दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- ड क्षेत्रिय कार्यालय
सुचक – मा.संदीप चिंचवडे अनुमोदक–मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/३८५/२०१६ दि.२/०७/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४-६/२०१५-१६ अन्वये रहाटणी श्रीनगर परिसरात टँकरव्दारे पाणीपुरवठा करणेकामी मे.सुदर्शन वॉटर सप्लायर्स नि.र.रु. ३,४९,०००/- (अक्षरी र.रु.तीन लाख एकोणपन्नास हजार फक्त) पेक्षा -०३.००% कमी, या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३,३८,५३०/- पर्यंत काम करुन घेणेस, तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कलावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे

बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेत आलेला असलेने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८१२ विषय क्रमांक – १०

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- ई-गव्हर्नन्स

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ई-गव्हर्नन्स/११/कावि/७३/१६ दि.१६/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे बांधकाम परवानगी विभागासाठी कार्यान्वित असेलेली Auto DCR ही संगणक प्रणालीची पुढील दोन वर्षा करीता देखभाल दुरुस्ती करणे, बांधकाम परवानगी विभागातील रोजचे कामकाज साठी एक तांत्रीक मनुष्यबळ पुरवणे व Auto DCR या संगणक प्रणालीत मनपाच्या डीसीआर नियमानुसार वेळोवेळी होणारे आवश्यक बदल करणे चे कामकाज मे.सॉफ्टटेक इंजिनियर्स प्रा.लि., यांना करारनामा करून देण्यास व त्याकरीता येणा-या एकुण दोन वर्षाकरीता र.रू.१३,९४,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८१३ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- उद्यान

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/२७६/२०१६ दि.१५/०७/२०१६

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपा उदयान विभागाकडील कोटेशन नोटीस क्र.01/2016-17 करीता मनपाचे उद्यान विभागासाठी शेणखत पुरविणेकामी मे.निषांत एंटरप्रायझेस कोटेशन नोटीस र.रू.1,99,883/- (अक्षरी र.रू.एक लाख नव्व्याण्णव हजार आठशे त्र्याऐंशी फक्त) अंदाजपत्रकिय दरापेक्षा (2% ने कमी) कोटेशन स्वीकृत करणेत आले असून आदेश उदयान/6/कावि/275/2016 दि.16/06/2016 अन्वये कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८१४ विषय क्रमांक – १२

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- क्रीडा

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/४/कावि/६३/२०१६ दि.०२/०७/२०१६

विषय:-पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागा मार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला/मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षण देणेबाबत.

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८१५ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- क्रीडा

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक–मा.अनिता तापकीर

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७/कावि/९२/२०१६ दि.०१/०६/२०१६

विषय:-खेळाडू दत्तक योजना २०१४-१५ व २०१५-१६ अनुषंगाने लाभार्थी खेळाडूंनी प्राविण्य मिळविलेल्या पात्र खेळाडूंना योजनेचा लाभ देणेबाबत.

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १६८१६ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सविता साळुंके अनुमोदक-मा.नारायण बहिरवाडे

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांची जा.क्र.मभां/५/कावि/६९४/२०१६, दि.२०/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे आरोग्य विभागास मॉस्किटो किलिंग सिस्टिम मशीन खरेदीकामी ई-निविदा क्र.१४/२०१६-१७ अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आलेले होते. त्यामध्ये प्राप्त निविदाकारापैकी मे. इंद्रनिल टेक्नॉलॉजीस यांचे मॉस्किटो किलिंग सिस्टिम मशीन चे सर्वात लघुत्तम दर र.रू. २१०५४२/- प्र.नग प्राप्त झालेले आहेत. प्राप्त लघुत्तम दराने आरोग्य विभागास तुर्तास ६ नग मॉस्किटो किलिंग सिस्टिम मशीन खरेदी कामी एकूण र.रू.१२,६३,२५२/- इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर हे मनपा अंदाजपत्रकीय दर एकूण र.रू.१२,६३,२५२/- इतके समान आहेत. सदर दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असून त्यांचेबरोबर करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक –१६८१७ विषय क्रमांक – १५

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक – मा.सुमन नेटके

संदर्भ:-मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी जावक क्र.मसाभां/१/कावि/१२५/२०१६ दि.२०/०७/२०१६

मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे आठ रुग्णालयाकरिता फिटेल डॉपलर खरेदी करणेकामी ई-कोटेशन नोटीस क्र २२/२०१६-१७ अन्वये दरपत्रके मागविणेत आले होते. त्यानुसार प्राप्त दरपत्रकांमध्ये मे.

महालक्ष्मी डिस्ट्रीब्युटर्स, पुणे यांनी सादर केलेले दरपत्रक र.रु.२९९९/- (सर्व करासह) लघुत्तम प्राप्त झाले आहेत. मे.महालक्ष्मी डिस्ट्रीब्युटर्स, पुणे यांचेकडुन फिटेल डॉपलर करिता प्रति नग र.रु.२९९९/- नुसार एकुण ८ नग खरेदीकरिता र.रु.२३,९९२/- करारनामा न करता खरेदी करणेस व सदर साहित्य खरेदी करणेकामी होणारा खर्च र.रु.२३,९९२/- (अक्षरी र.रू. तेवीस हजार नऊशे ब्यान्नव फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८१८ विषय क्रमांक – १६

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- विद्युत मख्यालय

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक–मा.सुमन नेटके

संदर्भ:-मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/८/कावि/३००/२०१६ दि.२१/०७/२०१६

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.18/2015-16 मधील अ.क्र.20 अन्वये ताथवडे पुनावळे प्रभागातील अंतर्गत रस्त्यावर आवश्यकतेनुसार दिवाबत्ती व्यवस्था बसविणे कामी मे. अबान इलेक्ट्रिकल वर्क्स नि.र.रू.11,99,999/- (अक्षरी र.रू.अकरा लाख नव्याण्णव हजार नऊशे नव्याण्णव फक्त) पेक्षा 39.56% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८१९ विषय क्रमांक – १७

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक–मा.सुमन नेटके

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.बक्षेआ/५/कावि/५७४/२०१६ दि.२०/०७/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रभाग क्रमांक ४२,४९,५०,५१,५३ मधील दैनंदिन शौचालय साफसफाईकामी या पूर्वी मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.आ/४/कावि/१८४/२००८ दि.६/५/२००८ नुसार क्षेत्रीय अधिका-यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार स्थानिक बेरोजगारांच्या सहकारी संस्था, स्वयंसेवी संघटना यांचे कडून साफसफाईचे काम करारनामा करून, करुन घेणेत येते. सदर आदेशानुसार असे करार जास्तीत जास्त ११ वर्षापर्यतच्या कालावधीसाठी करता येतात. त्यानुसार ब क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील अशा प्रकारचे काम करणा-या संस्था मे.समृद्धभारत स्वयं रोजगार सह सेवा संस्था मर्या. व मे. दीन महिला आधार रोजगार संस्था यांची करारनाम्याची मुदत दिनांक ३१/३/२०१६ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे सदर संस्थांना पुढील ६ महिन्यांसाठी मुदतवाढ देणेस वरील आदेशात नमूद केलेप्रमाणे प्रति सीट २५०/- या दराने करून घेणेस व याकामी

येणा-या अपेक्षित अंदाजे खर्च र.रु.३,२७,०००/- (अक्षरी र.रू. तीन लाख सत्तावीस हजार फक्त) स्विकारणेबाबत मा.आयुक्त दिनांक-२१/५/१६ व दिनांक २/७/१६ च्या मान्य प्रस्तावानुसार कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८२० विषय क्रमांक – १८

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- विद्युत मुख्यालय

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक–मा.सुमन नेटके

संदर्भ:-मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र.विमुका/५/कावि/४१/२०१६ दि.२१/७/२०१६

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.23/2015-2016 मधील अ.क्र.10 अन्वये वाकड उपविभागातील रस्त्यावरील नियोजित रस्ता दुभाजकात दिवाबत्ती व्यवस्था करणेकामी मे.यश इलेक्ट्रोलाईन नि.र.रू.11,55,631/-(अक्षरी र.रू.अकरा लाख पंच्चावन हजार सहाशे एकतीस फक्त) पेक्षा 41.43% कमी या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१६८२१ विषय क्रमांक – १९

दिनांक – ०२/०८/२०१६ विभाग- क क्षेत्रीय कार्यालय

सुचक – मा.वैशाली जवळकर अनुमोदक–मा.सुमन नेटके

संदर्भ:-मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे जावक क्र.कक्षे/आ१५ ब/कावि/८६८/२०१६ दि.२०/०७/२०१६

मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिचंवड महानगरपालिका क क्षेत्रीय आरोग्य विभागातील कचरा वाहतुक विभागामध्ये वाहनासाठी टायर ट्युब खरेदीकामी मा.आयुक्त यांचे कडील आदेश क्र.कक्षेका/आ१५ब/कावि/९२५/१५ दि.१४/१०/२०१५ अन्वये र.रू. ४६,०९७/- (अक्षरी र.रू. शेहचाळीस हजार सत्याण्णव फक्त) आगाऊ रक्कम घेणेत आलेली होती. आरोग्य विभागासाठी टायर ट्युब खरेदीकामी मे.सिएट लि., कंपनी यांचेकडुन आदेश क्र.कक्षेका/आ१५ब/कावि/९२५/१५ दि.१४/१०/२०१५ अन्वये खरेदी केलेनुसार कार्यशाळा विभागामार्फत वाहनांना टायर-ट्युब बसवणेत आलेले आहे. वाहनासाठी टायर ट्युब खरेदीकामी र.रू.४६०९७/- आगाऊ रक्कम घेणेत आली होती. त्यापैकी र.रू.४४६२१/- प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. उर्वरीत र.रू.१,४७६/- म.न.पा. कोषागरात पावती क्र.बी-४९७ दि.१५/१२/२०१५ अन्वये जमा केलेले असल्याने एकूण झालेला

खर्च र.रू.४६,०९७/- (अक्षरी र.रू.शेहचाळीस हजार सत्याण्णव फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/११/कावि/९९३/२०१६
दिनांक – ०३/०८/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.